शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

## न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

# १९९० नंतरची मराठी कादंबरी



★ ३४. 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी — डॉ. स्वप्निल बुचडे .............. १८४
३५. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदनांच्या पडझडीचे प्रतिबिंब — प्रा. संतोषकुमार डफळापूरकर .... १८८
३६. नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी स्त्री जाणिवा — प्रा. संगिता वामन सूर्यवंशी ....... १९२
३७. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव — प्रा. रेखा काशिनाथ पसाले ...... १९६
३८. ग्रामीण कादंबरीकार : अनुराधा गुरव — प्रा. स्मिता कोंडीबा कालभूषण .. २००
३९. १९९० नंतरच्या स्त्री कादंबरीतील जाणिवा — प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे ..... २०४
४०. 'अस्वस्थ नायक' व 'श्राद्ध' कादंबरीतील भाषा शैलीचा तौलनिक अभ्यास' — प्रा.सुजाता संजय चोपडे (इनामदार) २०८
४१. नव्वदोत्तरी कादंबरीचा आशय आणि स्वरुप — प्रा.डॉ.विजय अर्जुन रेवजे ......... २१२
४२. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — प्रा. जयवंत शं. सुतार ............ २१५
४३. १९९० नंतरची भटक्या-विमुक्तांची कादंबरी — सौ. विजयालक्ष्मी विजयदेवगोजी .. २२१
४४. एकोणीशे नवोदत्तरी मराठी कादंबरीची दशा आणि दिशा — प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक २२६
४५. 'नव्वदोत्तर मराठी कांदबरीतील समाजचित्रण' — डॉ. महावीर विठ्ठल कांबळे ...... २२८
४६. ११९० नंतरची महानगरीय कादंबरी — डॉ. मनीषा आझाद नायकवडी ... २३३
४७. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी — लिंगप्पा गुळाळे.................. २३८
४८. नव्वदोत्तरी आदिवासी कादंबरीतील निसर्ग जाणिवा — प्रा. रघुनाथ चंदर गवळी ......... २४२
४९. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित मराठी कादंबरीमधील स्त्री जाणिवा — डॉ. राजश्री बंडोपंत पोवार ......... २४७
५०. नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व — प्रा. डॉ. प्रदीप पाटील ........... २५२
५१. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कांदबरी — प्रा. गणपत हनुमंत निमसे ........ २५८
५२. १९९० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन — प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील २६२
५३. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण — अमोल सुभाष कवडे............. २६७
५४. नव्वदोत्तर मराठी कादंबरी : ग्राम आणि आदिवासी जीवन — अमोल चांदेकर.................. २७१
५५. १९९० नंतरच्या मराठी व हिंदी कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास — डॉ. भरत भीमराव जाधव ........ २७६
५६. 'नव्वदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्रीजीवन' — डॉ. भीमराव खं. वानोळे ........ २८२
५७. १९९० नंतरची दलित कादंबरी — डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे........ २८७
५८. '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी' — प्रा. दत्तू मेंगाळ .................. २९२
५९. १९९० नंतरची मराठी कादंबरी-विविधतापूर्ण विपुल प्रवाहित्व — डॉ. युवराज देवाळे ............. २९९
६०. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी — प्रा. मोहन चव्हाण ............... ३०३
६१. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन आणि भाषिक विशेष — डॉ. प्रकाश दुकळे ............... ३०९
६२. हिंदी उपन्यास साहित्य में प्रतिबिंबित बदलते मूल्य — प्रा.डॉ.सौ.एस.के.पाटील ......... ३१४
६३. Post-1990 Marathi Novel and the Language Change — Prof.Kirti Suhas Kurane ३१८
६४. Reflection of 'Educational Qualification' in Post 1990's Novels — Prof. Anita Powar ..... ३२१
६५. Contribution of Women Novelists In writing Marathi Novels After 1990s — Mrs. Daya Prasad Patil. ३२५




ISSN No. 2319-6025

# 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी

**डॉ. स्वप्निल बुचडे**
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

१९९० नंतरच्या मराठी साहित्याच्या केंद्रस्थानी सानिया यांची कादंबरी महत्त्वपूर्ण राहिली आहे. सानिया यांचा जन्म सांगली येथे १० नोव्हेंबर १९५२ रोजी झाला. त्यांचे नाव सुनंदा कुळकर्णी होय. सानिया या टोपण नावाने त्यांनी आपले साहित्य लेखन केले. लग्नानंतर त्यांचे नाव सुनंदा बलरामन असे झाले. वडिलांच्या नोकरीमुळे त्यांचे शिक्षण महाराष्ट्रातल्या अनेक शाळांमधून पूर्ण झाले. नाशिकच्या सरकारी कन्या शाळेतून त्यांनी आपले मॅट्रिकचे शिक्षण तर नाशिक कॉलेज आणि पुणे येथून त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सानियांच्या घरात साहित्यिक वातावरण नव्हते, पण त्यांच्यात मात्र हा गुण लहानपणापासूनच होता. १९७० पासून साधारणतः त्यांनी लेखनाला सुरवात केली. सत्यकथा, मौज, हंस, कथाश्री, किस्त्रीम, अक्षर, तरुण भारत, केसरी यासारख्या मासिकांतून त्यांचे लेखन प्रकाशित झाले. विवाहानंतर त्यांचे वास्तव्य देश विदेशात राहिले. दरम्यान त्यांनी समाजातील अनेक वृत्ती प्रवृतींची माणसे पाहिली. समाजात वावरताना जे अनुभवले, जाणवले ते लिहून काढले.

सानियांनी सुरवातीच्या टप्यात कथा हा साहित्य प्रकार हाताळला. शोध हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९८० मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर खिडक्या (१९८९), भूमिका (१९९४), वलय (१९९५), परिणाम (१९९६), प्रयाण (१९९७) हे त्यांचे कथासंग्रह त्याचबरोबर प्रतीत (१९८९), दिशा घराच्या (१९९१), ओळख (१९९२) आपण आपले (२००३) या दीर्घकथा प्रसिद्ध झाल्या. स्थलांतर (१९९०), आवर्तन (१९९६), अवकाश (२००१) या त्यांच्या तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. इतकी विपुल ग्रंथसंपदा सानिया यांनी वाचकांना दिली. स्त्रीचे अस्तित्त्व, तिची महत्त्वाकांक्षा तिचे व्यक्ती म्हणून जगणे, स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेणे या दृष्टिकोनातून एका कलात्मक पातळीवर त्यांनी स्त्रीचे विश्व मांडण्याचा केलेला प्रयत्न वेगळा आहे. त्यांच्या कादंबरीमध्ये झालेल्या स्त्री स्वातंत्र्याच्या चर्चेची चिकित्सा सदरच्या लेखाच्या निमित्ताने करता येईल.

'स्थलांतर' ही सानियांची पहिली कादंबरी १९९० साली प्रकाशित झाली. सानिया यांनी 'स्थलांतर' या कादंबरीत स्त्री-पुरुष मैत्रीचा धागा विणला आहे. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या अवतीभवती निर्माण होणारे प्रश्न त्यांनी कादंबरीच्या निमित्ताने चर्चेला आणले. गृहिणी म्हणून जगत असताना तिला होणाऱ्या यातना आणि तिच्या करिअरपुढे उभे राहणारे प्रश्न त्यांनी मांडले. पती-पत्नीचे पटत नसल्यामुळे विनाकारण नाते टिकविण्यात अर्थ न वाटल्याने होणारे घटस्फोट, त्याचबरोबर पारंपरिक विचार मानसिकतेतून नोंदल्या गेलेल्या स्त्री-पुरुष संबंधाचे चित्रण स्थलांतरमधून येते. स्थलांतर या कादंबरीत तीन पिढ्यांच्या स्त्रियांचे चित्रण सानियांनी केले. या कादंबरीत जगदीश व नंदिता ही दोन प्रमुख पात्रे आहेत. या दोघांचे नाते मामा आणि भाची या स्वरूपाचे आहे. या नात्यापुढे जाऊन एक दृढ विश्वास, सुरक्षिततेची मैत्री या दोघांमध्ये निर्माण झालेली या कादंबरीत येते. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव असलेली स्त्री व्यक्तिरेखा सानियांनी या कादंबरीत रेखाटली. स्वतःच्या करिअरच्या बाबतीत जागृत असणारी व एक नामवंत प्राध्यापक म्हणून सावित्रीचा उल्लेख

 ISSN No. 2319-6025

या कादंबरीत येतो. सावित्रीला झालेली मुलगी म्हणजे नंदिता होय. नंदिता ही लहानपणापासूनच बिनधास्त आणि स्वतंत्र विचार करणारी मुलगी चित्रित झाली आहे. मामासोबत तिची घनिष्ट, जिव्हाळ्याची व विश्वासाची मैत्री आहे. सावित्री, सावित्रीची आई अम्मा, आणि सावित्रीची मुलगी नंदिता अशा तीन पिढ्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक पटलाचा विचार सानियांनी या कादंबरीत चित्रित केला आहे. स्त्री–स्वातंत्र्याचा चर्चेबरोबरच पुरुषी मानसिकतेची नोंदही नंदिताच्या कुटुंबाच्याक निमित्ताने सानियांनी करून दिली आहे.

आवर्तन ही सानियांची दुसरी कादंबरी १९९६ साली प्रकाशित झाली. आवर्तन कादंबरीतील नायिका सुरची ही अनेक संघर्षांना तोंड देते. सुरचीच्या आयुष्याची झालेली ससेहोलपट किती विदारक आहे याची नोंद ही कादंबरी करते. फ्लॅश बॅक या तंत्राचा अवलंब करून या कादंबरीची मांडणी सानियांनी केली. सुरचीच्या सोबत तिला आयुष्यात साथ देणाऱ्या श्रीरंगचा अपघातात मृत्यू होतो. त्यानंतर तिची जी अवस्था होते ती या कादंबरीचा विषय होय. लहानपणी आई – वडील सुरचीला आजीकडे सोडून अमेरिकेला निघून जातात. तेव्हापासून एकटी, एकलकोंड आयुष्य ती जगते आहे. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात मर्लिन ही जिवाभावाची मैत्रीण तिला साथ देते. श्रीरंग बरोबर लिव्ह इन रिलेशनमध्ये राहत असताना निर्माण झालेले अनेक प्रश्न कादंबरीच्या केंद्रस्थानी येतात. तरीही सुरचीच्या बरोबर इला, अभिजित, स्वरूप तिला मानसिक साथ देत असते. लग्न न करता राहण्याची सुरचीची भूमिका नीनी नाकारते. सामाजिक दृष्ट्याही अशीच तिची कोंडी झालेली आहे. लग्न न करता एखाद्या पुरुषाबरोबर राहणे हा गुन्हाच ठरवला गेला. याठिकाणी सामाजिक परिस्थितीही विचारात घ्यावी लागते. एखाद्या अविवाहित जोडप्याने एकत्र येणं हे अनैतिक ठरवलं जाते. पण ह्या सगळ्यामागे असणारी त्या दोघांची मैत्री, भावनिक गुंतवणूक आपल्याला व समाजाला दिसत नाही. प्रेम करणं हा काही गुन्हा नाही, पण प्रेम कुणाबरोबर करावे हा विचार नक्की होताना दिसतो. तो व्यक्ती कुठल्या जातीचा, धर्माचा हा विचार करणं सामाजिकदृष्ट्या अपेक्षित असते. सुरची कोणताही सामाजिक विचार न करता अनेक निर्णय घेते. पण कायद्याच्या चौकटीत जर ते सज्ञान असतील आणि एकत्र येत असतील तर ते त्याचं स्वातंत्र्य म्हणून अबाधित राखणे गरजेचे असते. अशीच काहीशी परिस्थिती सुरचीच्या बाबतीत घडते.

इलाबरोबर सामाजिक चळवळीत स्त्रियांसाठी काम करत असताना तिची ओळख श्रीरंगबरोबर होते. ओळखीचे रुपांतर प्रेमात होते. त्यानंतर ते दोघे लग्न न करता एकत्र राहण्याचा निर्णय घेतात. यापाठीमागेही परिस्थिती जबाबदार असते. कुठेही रहायला घर मिळत नाही. अशावेळी दोघे एकत्र राहण्याचा निर्णय घेतात. एकत्र राहत असताना त्या दोघांच्या आचरणाला कोणताही अडसर नसतो. निखळ स्वातंत्र्य दोघेही उपभोगतात. एकमेकांना कोणत्याही बंधनात ठेवत नाहीत. पण सुरचीला सतत वाटत असते की, श्रीरंगने आपल्याशी लग्न करावे. आपणही कायद्यानं एकत्र यावे तेही पती – पत्नी म्हणून एकमेकांचे अनुभव समजून घ्यावेत. श्रीरंगने त्याच्याबद्दलच्या काही घटना सांगाव्या पण तसे तो करत नाही. कधीही घरी येतो, कधीही जातो. आपल्यासंदर्भात काही बोलत नाही. काही गोष्टी लपवून ठेवतो. यासंदर्भात दोघांच्यात वादही होतात. या साऱ्या घटनांचा सुरचीला त्रासही होतो. तो श्रीरंगमध्ये तिच्या गुंतण्याचा भाग असतो.

श्रीरंगच्या अपघातात अचानक दगावण्याने तिला खूप मोठा धक्का बसतो. दरम्यान बँकेकडून तिला समजते की, तिच्या नावावर तीन लाख रुपये श्रीरंगने ठेवले आहेत. ते पैसे श्रीरंगने सुरचीच्या भविष्यासाठी ठेवलेले असतात. या साऱ्या प्रसंगावरून असे म्हणावे वाटते की, स्वतःच्या पैशाला


ISSN No. 2319-6025

वारस सुरचीला देवून तिची सुरक्षितता श्रीरंग पाहतो आहे. यावरून श्रीरंगचे सुरचीशी असणारे नाते स्पष्ट होते. या सर्व गोष्टींचा विचार करता आपल्या लक्षात येते की, समाजात लग्न करूनही स्वतःच्या पत्नीवर संशय घेणारी अनेक उदाहरणे आपल्याला दिसून येतात. पण श्रीरंग तिला सोडून जातो असे म्हणत असतानाच तिच्यावर इतका विश्वास व्यक्त करतो हे वाखाणण्याजोगे आहे. इथेच स्त्रीचे स्त्री म्हणून स्थान न नोंदवता एक माणूस म्हणून केलेली मांडणी ही निश्चितच नोंदवण्यासारखी आहे.

यानंतरचा विचार करावा लागतो सुरचीची बहीण स्वरुपचा. अमेरिकेत आई वडिलांसोबत वाढलेली स्वरूप, नव्या आधुनिक संस्कृतीने आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांचा उल्लेख ती करते. अमेरिका स्थित आई वडिलांचे नातेबंध काही वेळा ती उलगडण्याचा प्रयत्न करते. ती नेहमी वडिलांच्या अनैतिक वागण्याचा आणि आईचा त्यांच्यावर संशय घेण्याच्या वृत्तीचा उल्लेख करते. अमेरिकन संस्कृती आणि तिथल्या साऱ्या गोष्टींना कंटाळून अखेर ती सुरचीचा मित्र आणि इलाला तिच्या कामात मदत करणाऱ्या अभिजीतशी विवाह करते. अभिजित हा नाट्य लेखक असतो. या दोघांचा सुखी संसार सुरु होतो. त्याचे फलित म्हणून गोंडस असा मुलगाही होतो. त्याचे नाव भारत असे ठेवले जाते.

सुरची या प्रमुख पात्राबरोबर येणारा श्रीरंग आणि त्याचे कुटुंब हे महत्त्वाचे आहे. कारण प्रचंड श्रीमंती असतानाही त्याबद्दल कोणताही बडेजावपणा न स्वीकारणारी श्रीरंगची आई चित्रित होते. सुरची त्यांना भेटायला गेल्यानंतर सुरचीला त्या श्रीरंगच्या बहिणीची सोन्याची साखळी (चेन) भेट देतात. तिच्याप्रती आपुलकीचा भाव निर्माण करू बघतात. दरम्यान श्रीरंगचे वडील मात्र आपल्याच व्यापात व्यस्त असतात. ज्यामुळे श्रीरंग त्याच्यापासून दुरावतो.

अवकाश ही सानियांची तिसरी कादंबरी २००१ साली प्रकाशित झाली. अवकाश या कादंबरीमध्ये एका मध्यमवर्गीय परंपरानिष्ठ तामिळ कुटुंबातील जान्हवीची कथा रेखाटली आहे. संपूर्ण कादंबरी जान्हवी या व्यक्तिरेखेभोवती गुंफली गेली आहे. परंपरानिष्ठ कुटुंबामुळे व स्त्री असल्यामुळे तिला जसे आयुष्य अपेक्षित असते तसे ती जगू शकत नसल्याचे चित्रण अवकाश कादंबरीमध्ये येते. प्रत्येक मुलीची आई आपल्या मुलीवर काही एक संस्कार करीत असते. ती तिच्या मुलीप्रती असणारी जबाबदारीची जाणीवच असते. त्यामुळे आपल्या मुलीला धाकात ठेवण्याचा प्रयत्न प्रत्येक आई करते. याचे चित्रण अम्मा आणि जान्हवीची आई या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून नोंदले गेले.

मद्रासला आल्यानंतर जान्हवी बी.एस्सी करायला लागते. तेव्हा ती सुदर्शनच्या प्रेमात पडते. तिच्यायोग्य तो असूनही घरच्यांना याबद्दल माहीत होताच ते सर्व तिला विरोध करतात. जान्हवीला शिक्षण घेण्याची इच्छा असूनही संपूर्ण कुटुंबाला जान्हवीचे लग्न महत्त्वाचे वाटते. तिचे करिअर, शिक्षण लग्नापुढे गौण ठरते. लग्नाकरिता तिच्या मनाचा विचार केला जात नाही. शेवटी राघवन नावाच्या व्यक्तीबरोबर तिचे लग्न लावून दिले जाते. तेही तिच्या मनाच्या विरुद्ध. जान्हवीला स्वतःच्या अस्तित्वाची पूर्णपणे जाणीव असूनही पारंपरिक कुटुंब असल्यामुळे तिला या परिस्थितीला सामोरे जावेच लागते. तिची मानसिकता या सर्वाला विरोध करणारी असूनही ती कोणत्याही प्रकारे संघर्ष उभा राहील असे वागत नाही. त्याचबरोबर तिच्या आयुष्यात आलेला राघवन हाही पारंपरिक स्वरूपाचा पुरुष (नवरा) म्हणूनच तिच्याशी भूमिका बजावतो. राघवनला जान्हवीचे कधीही कौतुक वाटत नाही. ती आपली फक्त सहचारिणी आहे. आपल्यापेक्षा जान्हवी सर्व कलागुणांनी पुढे आहे. तसेच तिचे सौंदर्यही तो सहज स्वीकारत नाही. उलट जान्हवी आपल्या वरचढ आहे व जास्त होईल याची त्याला भीती वाटते. म्हणून तो तिच्यावर अनेक बंधने लादतो. पण आयुष्यामध्ये पुढे मुले

मोठी झाल्यानंतर जान्हवी 'मालै नीळलं' (संध्याकाळच्या सावल्या) हे पुस्तक लिहिते. सदाशिवन नावाचे प्रकाशक तिचे पुस्तक प्रकाशित करतात. जान्हवी राघवन ही लेखिका बनते. खरे तर एक लेखिका होण्याचे गुण जान्हवीमध्ये असतातच, पण एकूण घरचे वातावरण आणि लग्नानंतरचे सासरचे वातावरण याला तोंड देत ती आपल्या आयुष्याला उभा करण्याचा प्रयत्न करते. एक उत्तम लेखिका म्हणून नावारूपाला येते. राघवनच्या मृत्यूनंतर जान्हवीला राघवन नसल्याने एकटेपणा कधीही जाणवत नाही, कारण तो असतानाही तिच्याशी कधीही एकरूप होऊन वागत-वावरत नसल्याचे चित्रित झाले आहे.

एकंदरीत कादंबरीचे मूल्यमापन करत असताना कादंबरीभर स्त्रियांच्या आयुष्यात उभे राहणारे संघर्ष हे वेगळ्या भूमिकेतून मांडले गेले. अन्यायग्रस्त अशी स्त्री चित्रित झाली. जी स्त्री स्वातंत्र्याची भूमिका स्वीकारते. पण ती पुरुषाला कुठेही नाकारताना मात्र दिसत नाही. काही बाबतीत या समाज मानसिकतेचा प्रभाव या पुरुषांवर दिसतो. तो या स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर, त्यांच्या जगण्यावर कुठेतरी मर्यादा आणू पाहतो. स्वतंत्र विचारांचा, आचरणाचा पुरस्कार करत असतानाच स्त्रीला समाजाने, व्यवस्थेने पुरुषाच्या बरोबरीने स्वीकारण्याची भूमिका सानिया आपल्या या कादंबऱ्यांच्या माध्यमातून मांडतात. सानिया परंपरा आणि आधुनिकता यांचा मेळ घालत मांडणी करतात. कोणताही अश्लील, लिंगभाव देणारा आणि अनैतिक पद्धतीने येणार असा विचार किंवा मांडणी होताना दिसत नाही. तर स्त्री ही सुद्धा पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करू शकते हा मुद्दा मांडण्याचं काम सानिया करतात. जाती-पाती, धर्म, संस्कृती या पलीकडचा विचार मांडत असतानाच पुरुषाच्या बद्दल जराही द्वेष कुठेही दिसत नाही. कुठेही आडमुठेपणाची भूमिका दिसत नाही. हे सानियांच्या कादंबऱ्यांचे स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने विशेष नोंदवता येतील.

स्थलांतर मधील 'नंदिता', आवर्तन मधील 'सुरुची' आणि अवकाश मधील 'जान्हवी' या साऱ्या स्त्रिया भारतीय स्त्री-पुरुष संस्कृती नाकारून जगण्याची धडपड करतात. त्यात त्या मानसन्मान व जागृती करू पाहतात. पुरुषासत्ताक व्यवस्थेने लादलेली गुलामगिरी, बंधने नाकारून बरोबरीने जीवन जगण्याची धडपड करतात. या स्वरूपाचे चित्रण सानियांनी तिन्ही कादंबऱ्यांतून अतिशय संयमाने रेखाटले आहे. स्त्रीची पारंपरिक मानसिकता बदलत ती आधुनिक विचारांकडे वाटचाल करतानाची त्यांच्या कादंबरीतून चित्रित झालेली बघायला मिळते.

**संदर्भ :**


१) सानिया, स्थलांतर : १९९४, मौज प्रकाशन, मुंबई

२) सानिया, आवर्तन : १९९६, मौज प्रकाशन, मुंबई

३) सानिया, अवकाशः २००१, मौज प्रकाशन, मुंबई


● ●




ISSN No. 2319-6025